# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.01.2025** **वार-गुरुवार**

---

**संविधान सन्मान**

महाराष्ट्राच्या भूमीशी आपलं भावनिक नातं आहे; असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज पुण्यात केलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा फुले - सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. भारतीय जनता पार्टीच्या वतीनं देशभरात संविधान गौरव अभियान सन्मान सभा आयोजित केली जात आहे; राज्यातलं पहिलं संविधान गौरव अभियान पुण्यातून सुरू झालं; त्या कार्यक्रमात ज्योतिरादित्य शिंदे बोलत होते. सावित्रीबाई फुले स्मारकाच्या परिसरात आयोजित या कार्यक्रमाला खासदार मेधा कुलकर्णी, आमदार सुनील कांबळे, हेमंत रासने उपस्थित होते.

**पुरस्कार**

अमेरिकेतल्या महाराष्ट्र फाउंडेशन समाजकार्य पुरस्कार समितीच्या वतीने दिला जाणारा डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति पुरस्कार यंदा ओरिसातले देबेंद्र सुतार यांना जाहीर झाला आहे. एक लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. माजी पोलीस आयुक्त मीरा बोरवणकर यांच्या हस्ते पुण्यात येत्या शनिवारी पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. देवेंद्र सुतार हे ओरिसा रॅशनॅलिस्ट सोसायटी या संघटनेचे राज्य सचिव आहेत.

**दिव्यांग**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने तीन दिवसांचा ‘पर्पल जल्लोष’ हा दिव्यांग महोत्सव आजपासून सुरू झाला. दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचं सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने हा महोत्सव घेण्यात येत आहे. येत्या 19 जानेवारीपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवामध्ये विविध विषयांवर स्पर्धा, विचारमंथन, तसंच मार्गदर्शनपर सत्र होणार आहेत.

**सुपरस्पेशालिटीरुग्णालय**

पुण्यातील ससून रुग्णालयामधील रुग्णसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याच वेळी सुपर स्पेशालिटी सुविधेवरील ताणही वाढू लागला आहे. त्यामुळे नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचा प्रस्ताव लवकरच सरकारकडे सादर करणार असल्याची माहिती ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी दिली.

**सेवाभवन**

मूत्रपिंडाच्या आरोग्याविषयी जनजागृती करण्यासाठी सेवा भवन रुग्णसेवा प्रकल्पानं 'सेवा भवन रन' या मॅरेथॉनचं आयोजन केलं आहे. ९ फेब्रुवारी रोजी सकाळी साडे पाच वाजता कर्वेनगरच्या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेपासून या मॅरेथॉनला प्रारंभ होईल. यामध्ये १८ वर्षांवरील महिला आणि पुरुषांना सहभागी होता येईल. पाच किलोमीटर आणि दहा किलोमीटर असे मॅरेथॉनचे दोन टप्पे आहेत.

**उमेदफाऊंडेशन**

उमेद फाऊंडेशनतर्फे दिव्यांग मुलं आणि त्यांच्या पालकांसाठी प्रकल्प राबवण्यात येतो, या प्रकल्पाच्या नवीन वास्तूची पायाभरणी येत्या २२ जानेवारीला पौड गावात होणार आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सुहास हिरेमठ यांच्या हस्ते पायाभरणी समारंभ होणार असल्याचं फाऊंडेशननं कळवलं आहे.

**<u>पीएमपी</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळाला २०२३-२४ या वर्षात सवलतीच्या विविध पाससाठी पुणे महापालिकेने २३ कोटी ५७ लाख रुपये देण्याबाबतचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने स्थायी समितीसमोर मंजुरीसाठी ठेवला आहे. महापालिकेच्या माध्यमिक शाळेचे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, स्वातंत्र्य सैनिकांना मोफत पास दिला जातो.

**<u>परिवहनमहामंडळ</u>**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पुणे विभागात डिसेंबर महिन्यात विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी ५७३ बस आरक्षित झाल्या होत्या. या प्रासंगिक करारामधून एसटीला एक कोटी ३० लाख रुपयांचं उत्पन्न मिळालं आहे.

**<u>रेल्वे</u>**

पुणे रेल्वे विभागाने विजेचा खर्च कमी करण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी सौर ऊर्जा यंत्रणा बसवली आहे. पुणे स्थानकासह घोरपडी कार्यशाळा, दौंड, कोल्हापूर, मिरज, सातारा अशा प्रमुख १० ठिकाणी हे सौरऊर्जा प्रकल्प सुरू आहेत. पुणे विभागात १ पूर्णांक ८ मेगावॅट सौरऊर्जा निर्माण केली जात असून, घोरपडी रेल्वे कार्यशाळेत सर्वाधिक क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित आहे; त्यामधून वर्षाला जवळपास ५५ लाख रुपयांची बचत होत असल्याचं मध्य रेल्वेनं सांगितलं.

**<u>वाहतूककोंडी</u>**

पुणे शहरातील वाहतूक कोंडी आणि वाढते अपघात रोखण्यासाठी विकास आराखड्यातील सर्व रस्त्यांचे स्वतंत्र 'डीपीआर 'तयार करावेत. अशी मागणी माजी उपमहापौर आबा बागुल यांनी पालिका

आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे केली. या कामासाठी आयएएस दर्जाचा स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा आणि स्वतंत्र कक्षाची निर्मिती करावी, असं बागुल यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३१ तर किमान १६ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. उद्या दुपारनंतर ढगाळ हवामान असेल आणि किमान १६ अंश तर कमाल ३१ अंश तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**